# ऋणनिर्देश

शिवाजी विद्यापीठाच्या एम्.फिल्. (मराठी) पदवी परीक्षेसाठी 'लोकसखा ज्ञानेश्वर : एक अभ्यास' हा लघुप्रबंध सादर करताना मला मनोमन खूप आनंद होत आहे. माझ्या लघुप्रबंधाचे मार्गदर्शक डॉ. रवींद्र ठाकूर यांचा स्वतंत्र्यपणे उल्लेख केला पाहिजे. त्यांच्या मार्गदर्शनामुळेच मी हे कार्य पूर्ण करु शकलो. त्यांचे आभार मानन्यापेक्षा मी आयुष्यभर त्यांच्या ऋणातच राहण्याचे अधिक पसंत करतो. सरांनी वेळोवेळी चर्चा करून मला बारीक-तपशील समजावून दिले. ज्यावेळी मी सरांच्याकडे जात असे त्या त्या वेळी सर हातातले काम बाजूला ठेवून माझ्याशी चर्चा करत.

मराठी विभागाचे विभाग प्रमुख डॉ. विश्वनाथ शिंदे, त्याचबरोबर डॉ. कृष्णा किरवले, प्रा. हिमांशू स्मार्त व डॉ. रणधीर शिंदे यांचेही मला मोलाचे मार्गदर्शन लाभले. तसेच मराठी विभागाच्या कार्यालयातील लिपिक सौ. शिगांवकर मॅडम, सौ. स्वामी मॅडम यांचीही वेळावेळी अनेक संदर्भात मदत झाली. या सर्वांचा मी मन:पूर्वक आभारी आहे.

तसेच डॉ. जी.पी. माळी सर (के.एम.सी. कॉलेज), प्रा. विजय मगदूम (महावीर कॉलेज), प्रा.सौ. बिसुरे मॅडम(गोखले कॉलेज), डॉ. जी.आर. पाटील (न्यू कॉलेज) या सर्वांचे मला सतत मार्गदर्शन लाभले त्या सर्वांचा मी ऋणी आहे.

माझे मित्र भरत लव्हटे, हेमंत कुंभार, सारीपुत्र तुपेरे व माझे बंधू रामचंद्र मिठारी यांनी मला सहकार्य केले त्याबद्दल मी त्यांचाही ऋणी आहे. माझ्या आतापर्यंतच्या वाटचालीत महत्त्वाचा वाटा उचलला ते माझे आई-वडिल, आत्या व बहिण या सर्वांचा मी मन:पूर्वक ऋणी आहे.

सदर लघुप्रबंधाच्या अभ्यासासाठी आवश्यक असणारे संदर्भ ग्रंथ करवीर वाचनालय, कोल्हापूर व बाळासाहेब खर्डेकर ग्रंथालय, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर येथील ग्रंथपालांनी मला वेळोवेळी उपलब्ध करून दिले त्याबद्दल मी आभारी आहे.

या लघुप्रबंधाचे टंकलेखन बिनचूक, सुबक व वेळेत पूर्ण करून दिल्याबद्दल श्रीकांत कॉम्प्यूटर्स व त्यांचे सहकारी यांचाही आभारी आहे.

**श्री. मिठारी दत्तात्रय शामराव**
अभ्यासक